शनिवार, २९ जानेवारी २०२२

# राम प्रहर


◆ वर्ष १४ ◆ अंक १९२
www.ramprahar.com

◆ पाने ६ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग

जेएनपीटीची विक्रमी माल हाताळणी/२
नवी मुंबईतील विस्तारित गावठाणाचे लवकरच सर्वेक्षण/३
शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्या; अन्यथा आंदोलन!/५

## राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन २८ फेब्रुवारीपासून नागपुरात



**मुंबई :** राज्य विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन नागपूरमध्ये होणार आहे. याबद्दल गेल्या अनेक दिवसांपासून वेगवेगळ्या चर्चा सुरू होत्या. त्यानंतर अखेर आता निर्णय झाला असून २८ फेब्रुवारीपासून कामकाजाला नागपूरमधून सुरुवात होणार आहे. मार्च महिन्यात अर्थमंत्री अजित पवार राज्याचा अर्थसंकल्प मांडतील. त्याआधी येत्या ३१ जानेवारीपासून दिल्लीत संसदेचे अधिवेशन होणार आहे. राज्याच्या अधिवेशनासाठी काही कालावधी शिल्लक असताना प्रशासनाला कोणत्याही प्रकारच्या सूचना आलेल्या नव्हत्या. वरिष्ठ पातळीवरही बांधकाम विभागाची एकही बैठक झालेली नव्हती. त्यामुळे अधिवेशनाची घोषणा फक्त राजकीय ठरणार असल्याची चर्चा रंगली होती, मात्र २८ तारखेपासून विधिमंडळाच्या कामकाजाला नागपूरमधून सुरुवात होणार असल्याने अर्थसंकल्पीय अधिवेशन नागपूरमध्ये होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# ठाकरे सरकारला दणका!

## भाजपच्या १२ आमदारांचे निलंबन रद्द



**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाच्या १२ आमदारांचे निलंबन सर्वोच्च न्यायालयाकडून रद्द करण्यात आले आहे. हा निकाल ठाकरे सरकारसाठी मोठा दणका मानला जात आहे.

इतर मागासवर्गीयांचे (ओबीसी) राजकीय आरक्षण कायम राहावे यासाठी पावसाळी अधिवेशनात विरोधी पक्ष असलेल्या भाजपच्या सदस्यांनी आवाज उठविला होता. यामुळे भाजपच्या १२ आमदारांना एका वर्षासाठी निलंबित करण्यात आले होते. या निर्णयाविरोधात भाजपच्या सदस्यांनी सुप्रीम कोर्टात दाद मागितली होती. या याचिकेवर बऱ्याच दिवसांपासून सुनावणी सुरू होती. अखेर न्यायालयाने शुक्रवारी (दि. २८) ऐतिहासिक निकाल दिला.

सर्वोच्च न्यायालयाने आमदारांना निलंबित करण्याचा ठराव असंवैधानिक असल्याचे म्हटले आहे, तसेच निलंबन करायचे होते, तर ते फक्त एका अधिवेशनापुरतेच असायला हवे होते, असेही नमूद करीत ठाकरे सरकारच्या कार्यपद्धतीवर कडक ताशेरे ओढले आहेत.

दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे भाजपच्या १२ आमदारांना दिलासा मिळाला आहे. या आमदारांमध्ये आशिष शेलार, गिरीश महाजन, अतुल भातखळकर, राम सातपुते, संजय कुटे, योगेश सागर, किर्तीकुमार बागडिया, जयकुमार रावल, अभिमन्यू पवार, पराग अळवणी, नारायण कुचे, हरिश पिंपळे यांचा समावेश आहे.

## राज्य सरकारच्या कृतीला थप्पड -देवेंद्र फडणवीस




**पणजी :** सर्वोच्च न्यायालयाने भाजप आमदारांच्या निलंबनाची कृती असंवैधानिक ठरवली आहे. न्यायालयाने कठोर शब्द वापरले आहेत. एक प्रकारे राज्य सरकार आणि त्यांच्या असंवैधानिक कृतीला ही थप्पड आहे, अशा शब्दांत महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा विधानसभा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी न्यायालयाच्या निर्णयावर प्रतिक्रिया दिली आहे. ते गोव्यात घेतलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते. आता ही कारवाई करणाऱ्यांनी १२ आमदारांच्या मतदारसंघातील नागरिकांची माफी मागावी, अशी मागणीही फडणवीस यांनी केली आहे.

भाजपच्या १२ आमदारांना षड्यंत्र रचून निलंबित केल्याचा आरोप या वेळी विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी केला. हा निर्णय यासाठी महत्त्वाचा आहे की, हे १२ आमदार राज्य सरकारने ओबीसी आरक्षणाच्या संदर्भात जो घोळ घातला त्याविरुद्ध आवाज उठवत होते. अशा वेळी सभागृहात न घडलेल्या घटनेकरिता आणि उपाध्यक्षांच्या चेंबरमध्ये जी घटना घडली त्याचे कपोलकल्पित रूप तयार करून त्या आधारावर षडयंत्र रचून या १२ आमदारांना निलंबित करण्यात आले होते. आर्टिफिशियल बहुमत तयार करण्यासाठी १२ सदस्यांना वर्षभरासाठी निलंबित करण्यात आले होते, असेही ते म्हणाले.

> **महाराष्ट्र सरकारला सुप्रीम कोर्टाने चपराक दिली आहे. सरकारने सुडबुद्धीने केलेली ही कारवाई होती. निलंबन करीत सरकारला आपली पोळी भाजून घ्यायची होती. हे एक षड्यंत्र होते. आम्हा लोकप्रतिनिधींवर अन्याय होता. यावर हा ऐतिहासिक निकाल म्हणावा लागेल.**
> **-गिरीश महाजन, आमदार**



(छाया : लक्ष्मण ठाकूर) अधिक छायाचित्रे पान ६ वर..

राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धा

# महाअंतिम फेरीचा शानदार प्रारंभ

## मान्यवरांची उपस्थिती





**पनवेल : प्रतिनिधी**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर (सीकेटी) स्वायत्त दर्जाप्राप्त महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आठव्या राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेच्या महाअंतिम फेरीचा शुक्रवारी (दि. २८) सकाळी आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात शानदार प्रारंभ झाला.

नगरसेवक अनिल भगत यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून महाअंतिम फेरीला सुरुवात झाली. उद्घाटन समारंभाला अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या पनवेल शाखेचे उपाध्यक्ष व महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर, नगरसेवक नितीन पाटील, नगरसेविका दर्शना भोईर, रूचिता लोंढे, स्पर्धेचे परीक्षक सुप्रसिद्ध अभिनेते मकरंद अनासपुरे, अभिनेते व दिग्दर्शक विजय केंकरे, अभिनेते संजय मोने, सहप्रायोजक नील ग्रुपच्या कल्पना कोठारी आदी उपस्थित होते.

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ हे फक्त सांस्कृतिक व्यासपीठ नसून कलाकार निर्माण करणारे व्यासपीठ असल्याचे सांगून नगरसेवक अनिल भगत म्हणाले की, आमदार प्रशांत ठाकूर व सभागृह नेते परेश ठाकूर हे लोकांना एक व्यासपीठ कसे निर्माण करता येईल असा विचार करून कार्यरत असतात. लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे सर्वव्यापी विचार लोकांपर्यंत पोहचवण्याचे काम या व्यासपीठामार्फत केले जाते. आपली सगळ्यांची साथ आम्हाला अशीच राहील आणि आपल्या सर्वांच्या आशीर्वादाच्या मदतीने आम्ही पुढे वाटचाल करीत राहू.

मुंबईतील प्रमुख थिएटर्सच्या 'तिडीक' या एकांकिकेच्या प्रयोगाने स्पर्धेच्या महाअंतिम फेरीला सुरुवात झाली. दिवसभरात नऊ एकांकिका सादर झाल्या. या स्पर्धेला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद लाभत असून कोरोनाच्या नियमांचे पालन करण्यात येत आहे. कोरोना प्रतिबंधात्मक लसीचे दोन डोस घेतलेल्यांनाच नाट्यगृहात प्रवेश दिला जात आहे. (प्रतिक्रिया पान २ वर..)

## निवडक

### पदोन्नतीतील आरक्षणाबाबत सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा

**मुंबई :** सर्वोच्च न्यायालयाने पदोन्नतीच्या आरक्षणाबाबत शुक्रवारी (दि. २८) निकाल देताना कोणतेही निकष ठरवण्यास नकार दिला. राज्य सरकारी नोकऱ्यांमध्ये अनुसूचित जाती (एससी) आणि अनुसूचित जमाती (एसटी) च्या प्रतिनिधित्वाची आकडेवारी जमा करण्याची जबाबदारी राज्य सरकारची आहे, असे कोर्टाने स्पष्ट केले, तसेच अशा प्रकारचे आरक्षण लागू करण्यापूर्वी राज्य सरकारने ही माहिती जमा करून त्या आधारावर निर्णय घेणे आवश्यक आहे, असेही नमूद केले. या संदर्भातील पुढील सुनावणी २४ फेब्रुवारीला होईल.

### 'भारत बायोटेक'च्या बूस्टर डोस चाचणीला परवानगी

**नवी दिल्ली :** भारत बायोटेक कंपनीच्या इंट्रानेझल बूस्टर डोसच्या चाचण्यांसाठी ड्रग्ज कंट्रोलर जनरल ऑफ इंडिया (डीजीसीआय)ने परवानगी दिली आहे. तिसऱ्या डोसच्या फेज-३ चाचणीसाठी अर्ज सादर करणारी भारत बायोटेक ही दुसरी कंपनी आहे. इंट्रानेझल लसींमध्ये कोविड-१९ विषाणूंचे संक्रमण रोखण्याची क्षमता असल्याचा कंपनीचा दावा आहे.

## राज्यातील ७५ हजार बुथवर होणार मन की बात कार्यक्रम

### भाजप प्रदेश उपाध्यक्ष प्रसाद लाड यांची माहिती

**मुंबई : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ३० जानेवारी रोजी होणाऱ्या 'मन की बात निमित्त' राज्यातील भारतीय जनता पक्षाच्या ७५ हजार बुथवर कार्यक्रम होणार आहेत, अशी माहिती भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष व या कार्यक्रमाचे संयोजक आमदार प्रसाद लाड यांनी शुक्रवारी (दि. २८) दिली. पक्षाच्या प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.




आमदार लाड यांनी सांगितले की, मन की बात कार्यक्रम पक्षाच्या सर्व बूथवर ऐकला जावा असा निर्णय प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील, माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राष्ट्रीय सरचिटणीस व या कार्यक्रमाचे राज्य प्रभारी विनोद तावडे यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत नुकताच घेण्यात आला. त्यासाठी राज्यस्तरीय संयोजन समिती स्थापन केली गेली आहे. या समितीचे प्रवीण घुगे सहसंयोजक असून समितीत आमदार संजय कुटे, राजेश बकाणे, इद्रिस मुलतानी, चैतन्य देशमुख, बबनराव चौधरी, बाळासाहेब सानप, प्रमोद जठार, संदीप लेले, अमित गोरखे, संजय उपाध्याय यांचा समावेश आहे.

मन की बात कार्यक्रम समाजातील शेतकरी, माजी सैनिक, वकील, डॉक्टर, ऊसतोड कामगार या वर्गापर्यंत पोहचविण्यासाठी पक्षाचे कार्यकर्ते विशेष प्रयत्न करणार आहेत. या वेळी प्रत्येक बूथ समितीची बैठकही होणार असून या बैठकीत संघटनात्मक कार्याचा आढावा घेतला जाईल, असे आमदार लाड यांनी नमूद केले.

### वैजनाथ देवस्थान जमीन हस्तांतरण घोटाळा

## भाजप नेते किरीट सोमय्यांचे कर्जतमध्ये आंदोलन

### प्रशासन सहकार्य करीत नसल्याचा आरोप



(छाया : संतोष पेरणे)

**कर्जत : बातमीदार**

कर्जत तालुक्यातील वैजनाथ येथील देवस्थान जमीन हस्तांतरण घोटाळा आणि अलिबागमधील वन जमिनीवरील बंगल्याप्रकरणी रायगड जिल्ह्यातील प्रशासन कोणत्याही प्रकारचे सहकार्य करीत नसल्याचा आरोप भाजपचे नेते, माजी खासदार किरीट सोमय्या यांनी केला आहे. दरम्यान, गेली सव्वा वर्षे पाठपुरावा करूनदेखील ठोस माहिती मिळत नसल्याने सोमय्या यांनी शुक्रवारी (दि. २८) कर्जत तहसील कार्यालयाबाहेर जमिनीवर बसून उपोषण करीत राज्य सरकारविरुद्ध घोषणाबाजी केली.

राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या निवडणूक शपथपत्रात कर्जत तालुक्यातील वैजनाथ येथील जमिनीचा दोनदा उल्लेख आला होता. या जमिनीची माहिती घेण्यासाठी माजी खासदार किरीट सोमय्या यांनी कर्जत येथे येऊन तहसीलदारांना संबंधित प्रकरणाची माहिती मिळावी यासाठी पत्र दिले होते. त्यानंतर संबंधित जमिनीबाबत नवनवीन माहिती सोमय्या यांच्यामुळे पुढे आली, मात्र दरम्यानच्या काळात या हिंदू देवस्थानची जमीन सलीम या मुस्लिम व्यक्तीच्या नावे कशी झाली याबद्दल जिल्हा प्रशासनाकडे खुलासा मागण्यात आला होता, मात्र सव्वा वर्षात त्याबाबत कोणतीही माहिती मिळाली नाही. या पार्श्वभूमीवर मागील आठवड्यात सोमय्या हे थेट वैजनाथ येथे पोहचले आणि तेथील तलाठी कार्यालयात जाऊन त्यांनी माहिती घेतली. त्यानंतर कर्जत तहसील कार्यलयात येऊन तहसीलदार विक्रम देशमुख यांना लेखी पत्र देत काही माहिती त्यांनी मागितली आणि संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी केली होती.

भाजप नेते किरीट सोमय्या शुक्रवारी दुपारी कर्जत येथे आले आणि त्यांनी तहसीलदारांची भेट घेऊन वैजनाथ येथील देवस्थान जमिनीबाबत माहिती मागितली. त्यानंतर तहसील कार्यालयातून बाहेर आलेल्या सोमय्या यांनी तेथील एका रिकाम्या शेडमध्ये जमिनीवर बसून आंदोलन सुरू केले. या वेळी सोमय्या यांच्यासोबत भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. त्यात तालुका अध्यक्ष मंगेश म्हसकर, जिल्हा उपाध्यक्ष रमेश मुंढे, किसान मोर्चाचे प्रदेश सचिव सुनील गोगटे, भाजप शहर अध्यक्ष बळवंत घुमरे, महिला मोर्चा तालुका अध्यक्ष स्नेहा गोगटे, भाजप तालुका सरचिटणीस संजय कराळे, उपाध्यक्ष सचिन म्हसकर, युवा मोर्चा अध्यक्ष प्रमोद पाटील, नगरसेविका स्वामिनी मांजरे, तसेच सरस्वती चौधरी, बिनिता घुमरे, गायत्री परांजपे, संदेश कराळे, मिनेश मसणे, केशव तरे, मयूर शितोळे, विजय कुलकर्णी, प्रभाकर पवार, अंकुश मुने, सर्वेश गोगटे आदी उपस्थित होते. (पान २ वर..)

# पनवेल भिंगारवाडीत रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन

## कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या निधीतून ग्रामस्थांना सुविधा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष तथा कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या निधीतून पनवेल तालुक्यातील भिंगारवाडी येथे करण्यात येणाऱ्या रस्त्याचे भूमिपूजन भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. २८) झाले. भाजप युवा मोर्चाचे पळस्पे जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष योगेश लहाने यांच्या वाढदिवसानिमित्त रस्त्याची भेट ग्रामस्थांना देण्यात येत आहे.

कार्यतत्पर लोकप्रतिनिधी अशी ओळख असलेल्या आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली पनवेल तालुक्याचा सर्वांगीण विकास होत आहे. त्यांच्या स्थानिक विकास निधीमधून वाधवा सिटी ते भिंगारवाडीपर्यंतच्या रस्त्याचे काँक्रिटीकरण सात लाख १० हजार रुपयांचा निधी खर्च करून करण्यात येणार आहे. भाजप युवा मोर्चाचे पळस्पे जि. प. विभागीय अध्यक्ष योगेश लहाने यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून या रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते करण्यात आले.

भूमिपूजन समारंभाला भाजपचे तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, माजी सरपंच सुभाष जेठू पाटील, कोन पंचायत समिती विभागीय अध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील, भिंगारवाडीचे सरपंच रामदास खेत्री, बेलवलीचे सरपंच बबन पवार, शेडूंगचे उपसरपंच मच्छींद्र दुर्गे, बोर्ले ग्रामपंचायतीचे सदस्य घनश्याम पाटील, भिंगारवाडी ग्रामपंचायतीचे सदस्य सतिश पाटील, माजी सरपंच निलेश पवार, युवा मोर्चा कोन पंचायत समिती विभागीय अध्यक्ष संदेश पाटील, उद्योजक सुनील पाटील, (पान २ वर..)

## खालापुरात कंपनीची चिमणी कोसळून एक ठार, तीन जण जखमी

**खालापूर : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील होनाड ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या जयशिंग अलाईस कंपनीची चिमणी कोसळून एक कामगार ठार, तर इतर तिघे जखमी झाल्याची घटना शुक्रवारी (दि. २८) घडली.

संजय सहानी, विजय यादव, अनिल सहानी, विनोद गौड (सध्या रा. चिंचवली, खालापूर) हे चार कामगार पहिल्या पाळीत काम करीत असताना सकाळी १०च्या सुमारास सोसायट्याचा वारा सुटून कंपनीतील चिमणी कोसळली. यात संजय सहानी (वय ३६) यांचा जागीच मृत्यू झाला, तर विजय यादव गंभीर जखमी असून त्याची प्रकृती चिंताजनक आहे. याशिवाय अनिल सहानी व विनोद गौड जखमी झाले आहेत. या वेळी कंपनीतील कामगारांनी दुर्घटनाग्रस्त कामगारांच्या कुटुंबाना मदत करावी, अशी मागणी करीत काम बंद आंदोलन केले.

## एनसीसीच्या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जागविल्या आठवणी



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी शुक्रवारी (दि. २८) दिल्लीत झालेल्या राष्ट्रीय छात्र सेनेच्या (एनसीसी) एका कार्यक्रमात आपल्या आठवणी जागविल्या. आपणही कधी काळी एनसीसीचा कॅडेट होतो, असे त्यांनी सांगितले.

दिल्लीच्या करिअप्पा ग्राऊंडवर एनसीसीचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदींनी उपस्थित एनसीसी कॅडेट्सना मार्गदर्शन केले. मला गर्व आहे की, मीदेखील कधीकाळी तुमच्याप्रमाणेच एनसीसीचा सक्रिय कॅडेट होतो. मला एनसीसीमध्ये ज्या प्रकारचे प्रशिक्षण मिळाले आहे, ज्या काही गोष्टी माहिती झाल्या, शिकायला मिळाल्या त्या सर्व गोष्टींचा मला आज देशाचा पंतप्रधान म्हणून माझ्या जबाबदाऱ्या पार पाडताना फायदा होत आहे, त्यातून वेगळी ताकद मला मिळते आहे, असे पंतप्रधान मोदी म्हणाले. या वेळी पंतप्रधानांनी आपल्या लूकने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

## निवडक



### उरणमध्ये प्रजासत्ताक दिनी कार्यक्रम

**उरण :** तालुक्यातील केगाव आवेडा येथील स्टार किड्स क्लास तर्फे भारतीय प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये नृत्य, भाषण अशा विविध कला मुलांनी सादर केल्या. पळणे, बेडूक उडी, संगीत खुर्ची असे विविध खेळ खेळून मुलांनी कार्यक्रम साजरा केला. मुलांबरोबर त्यांच्या पालकांनी सुद्धा सहभाग घेतला. खाऊ वाटप करून सांगता समारोप करण्यात आला. या वेळी शिक्षिका धनश्री पाटील, अक्षय पाटील, माजी सरपंच आरती पाटील, स्नेहल पाटील आदी उपस्थित होते.

### पोलीस उपनिरीक्षक धनाजी काळेंचा गौरव

**मोहोपाडा :** रसायनी पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक धनाजी भैरु काळे यांना प्रजासत्ताक दिनी अलिबाग येथे जिल्हा पोलिस अधीक्षक अशोक दुधे यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन त्यांच्या कामगिरीचा गौरव करण्यात आला. धनाजी काळे यांनी याअगोदर गडचिरोली या जिल्ह्यामध्ये कार्यरत असताना नक्षलविरोधी कारवाईपूर्वी व दरम्यान नक्षलवाद्यांच्या नेमक्या हालचाली, सुरुंग लावण्याच्या गोपनीय बातम्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कौशल्याने कामगिरी बजावल्याबद्दल त्या असाधारण प्रसुचना पदक-२०२१ मंजुर करण्यात आलेले आहे. त्यांच्या या कामगिरीबद्दल त्यांना प्रजासत्ताकदिनी गौरविण्यात आले.



### नवी मुंबईत विशेष स्वच्छता अभियान

**नवी मुंबई :** प्रजासत्ताक दिनाचे औचित्यसाधून नवी मुंबई महापालिका व पर्यावरणवादी संस्थांच्या सहभागाने ज्वेल ऑफ नवी मुंबई व परिसरामध्ये विशेष स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या वेळी परिसरामधील ७०० किलो कचरा गोळा करण्यात आला. या मोहिमेमध्ये ३० ते ४० विविध संस्था सहभागी झाल्या होत्या. नवी मुंबई महापालिका अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले, उपायुक्त तथा स्वच्छ भारत मिशनचे महापालिका नोडल अधिकारी डॉ. बाबासाहेब राजळे, मुख्य स्वच्छता अधिकारी राजेंद्र सोनवणे, बेलापूर विभाग अधिकारी डॉ. मिताली संचेती यांच्यासह विविध सामाजिक संस्थेचे पदाधिकारी, पालिका कर्मचारी या वेळी उपस्थित होते.

### प्रशिक्षक संजय भोईर यांना पुरस्कार

**पनवेल :** डायनामि युथ स्पोर्टस् ॲकॅडमी इंडीयाच्या वतीने अभिमान महाराष्ट्राचा हा पुरस्कार वितरण सोहळा गुरुवारी



आद्यक्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यामध्ये तायक्वांदो या क्रिडा प्रकारात केलेल्या सर्वोत्तम कामगिरीबद्दल सर्वोत्कृष्ट प्रशिक्षक म्हणून वीर तायक्वांदोचे संचालक संजय भोईर यांना अभिनेत्री रसिका वेंगुर्लेकर यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या वेळी शशिकांत केरकर, निलेश शेलार, ऋतुजा बागवे, यामिनी महामुणकर, रोहन कदम, मनीष गद्रिलकर आदी उपस्थित होते.

# 'अटल करंडक'च्या आयोजनाचे कौतुक

**पनवेल : नितीन देशमुख**

**श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या आठव्या राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेची महाअंतिम फेरी २८ ते ३० जानेवारीदरम्यान पनवेलमध्ये होत आहे. या स्पर्धेच्या आयोजनाचे कलाकार, प्रेक्षक व रंगकर्मींनी कौतुक केले आहे.**




आठव्या राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेचे आयोजन सुंदर झाले आहे. कोरोनाच्या परिस्थितीत ही लसीकरण सर्टिफिकेट पासून त्यांचे तापमान मोजण्यापर्यंत सगळ्याची काळजी घेऊन स्पर्धकांना सेफ्टी किट देऊन त्यांची काळजी घेऊन एखादी संस्था मोठी स्पर्धा घेत असते ते अभिनंदनीय आहे. आमदार प्रशांत ठाकुर त्यांच्या टिमचे मनपूर्वक अभिनंदन. मी आणि माझी टिम या ठिकाणी खास जळगावहून या स्पर्धेचा आस्वाद घेण्यासाठी आलो आहोत.
-विशाल जाधव, केंद्र समन्वयक, जळगाव

अटल करंडक एकांकिका स्पर्धेचे आयोजन चांगले आहे. मी अंतिम फेरीला आवर्जून आलो, कारण मला एकांकिका करण्याचा आणि बघण्याचा अनुभव आहे. मी राज्य नाट्यस्पर्धेत काम केलेले आहे. आयोजकांचे कौतुक करावे तेवढे थोडे आहे. प्रवेशद्वारापासून त्यांनी लावलेली पोस्टर त्यांचा डिस्प्ले केला आहे तो वाखणण्यासारखा आहे. सकाळपासून पाहिलेल्या तिन्ही एकांकिका दर्जेदार होत्या. परीक्षक ही नावाजलेले असल्याने स्पर्धेचा निकाल चांगलाच लागेल याची खात्री वाटते.
-नंदकुमार शिपुरकर, खारघर



अटल करंडक एकांकिका स्पर्धा पाहण्यासाठी मी दरवर्षी येते. या स्पर्धेतील एकांकिका दर्जेदार असतात. आमच्यासारख्या नाट्य रसिकांना एक मेजवानीच मिळते. त्यामुळे आमच्या शाळेचा पूर्ण स्टाफ येतो. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर येथील व्यवस्था खूप चांगली आहे. सॅनिटाईज करून आपली पूर्ण काळजी घेतली जाते. त्यामुळे आयोजकांचे करावे तेवढे कौतुक कमीच आहे.
-विशाखा डोंगरदिवे, शिक्षिका, सेंट थॉमस स्कूल, नवीन पनवेल



आम्ही रायगडमधून अटल करंडक प्राथमिक फेरीत गुज ही एकांकिका सादर केली होती. पहिल्या फेरीत प्रथम आल्याने अंतिम फेरी सादर केल्यावर लोकांच्या छान प्रतिक्रिया मिळाल्या. अटल करंडकचे आठवे वर्ष आठवणीत राहणारे आहे, कारण त्याचे आयोजन सुंदर आणि शिस्तबध्द केले आहे. स्पर्धा म्हटली की धम्माल, मनातली हुरहूर या सगळ्याचा अनुभव आम्ही घेत आहोत. अटल करंडक असेच पुढे पुढे चालत राहो आणि आम्ही छान अनुभव घेत राहो यासाठी आयोजकांना शुभेच्छा!
-ज्योती बावधनकर, राऊळ, अलिबाग



अटल करंडकशी माझे वैयक्तिक एक वेगळे नात आहे. ती मल्हार करंडक नावाने चालू होती त्यावेळी २०११चा उत्कृष्ट अभिनेता होतो, तर आज माझ्याबरोबर गुजमध्ये काम करणारी ज्योती बावधनकर-राऊळ त्यावेळची उत्कृष्ट अभिनेत्री होती, पण आम्ही वेगवेगळ्या संघातून काम केले होते. आज १० वर्षांनी पुन्हा एकत्र येतोय ते एकाच संघातून हा आमच्यासाठी एक योगायोग आहे. तेव्हापासून बघतोय या स्पर्धेचे आयोजक हे कोणत्याही बाबतीत कमी पडणारे नाहीत. यावर्षीचे आयोजन कोरोना महामारीमुळे कठीण वाटत होते, पण आयोजकांनी ही स्पर्धा इतक्या सोप्या पद्धतीने आयोजित करून दाखवून दिले तो एक आदर्श आहे. अटल करंडक स्पर्धेशी माझे नाते अतूट रहावो हीच सदिच्छा!
-किरण साष्टे, अलिबाग



मी नॉन मराठी आहे. मला मराठी नाटक पहिल्यापासून पसंत आहेत. मराठी नाटकाचा अनुभव चांगला असतो. मी स्वत: एक नाटकार, कलाकार आहे. अटल करंडक हे नामांकित स्पर्धा आहे.त्यामुळे कलाकार, नाट्यलेखक, दिग्दर्शक यांना एक स्टेज मिळते. कोरोनानंतर पहिल्यांदा आम्ही कलाकार एकत्र आलो आहोत. चांगला मोहल आहे. खूप लोक जमलेत. चांगला अनुभव मिळत आहे. इथली व्यवस्था खूप चांगली आहे. -रुद्र प्रतापसिंग, मुलुंड





**पनवेल : महापालिका हद्दीतील काळुंद्रे येथे मलनिस्सारण वाहिण्या टाकण्याचे काम सुरू आहे. या कामाची सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शुक्रवारी अधिकाऱ्यांसह पाहणी करून कामाचा आढावा घेतला व आवश्यक त्या सूचना दिल्या. या वेळी प्रभाग समिती 'ड'च्या सभापती ॲड. वृषाली वाघमारे, नगरसेवक अजय बहिरा, नगरसेविका चारुशीला घरत, तसेच जितेंद्र वाघमारे, शंकर म्हात्रे, गुरुनाथ घरत, सचिन चिपळेकर, ठेकेदार एल. एल. पाटील यांच्यासह महापालिकेचे अधिकारी उपस्थित होते.**

## जेएनपीटी बंदरामध्ये विक्रमी माल हाताळणी


**उरण : वार्ताहर**

जेएनपीटीची माल हाताळणीत सातत्यपूर्ण वाढ सुरूच आहे. २०२१मध्ये जेएनपीटी बंदरात एकूण ५.६३ दशलक्ष टीईयू (५,६३१,९४९ टीईयू) कंटेनर वाहतूक हाताळणी झाली, जी २०२०च्या (४.७ दशलक्ष टीईयू) तुलनेत २५.८६% अधिक आहे.

याबद्दल जेएनपीटीचे अध्यक्ष संजय सेठी यांनी प्रजासत्ताक दिनी बंदराचे सर्व कर्मचारी, अधिकारी व भागधारकांचे, तसेच प्रथमच एका वर्षात एक दशलक्ष टीईयूचा टप्पा पार करणाऱ्या एनएसआईजीटी व बीएमसीटी टर्मिनल यांचे अभिनंदन केले. कोरोना काळात जेएनपीटीने आपल्या भागधारकांसाठी एंड-टू-एंड पोर्ट ऑपरेटर बनण्याचा निर्धार केला, ज्यामुळे त्यांच्या मालाची वेळेवर आणि सुरक्षित वाहतूक सुनिश्चित होण्यास व वाहतूक खर्च कमी होण्यास खूपच मदत झाली, असे सेठी यांनी सांगितले.



**पनवेल : भाजप युवा मोर्चाचे पळस्पे विभागीय अध्यक्ष योगेश लहाने यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, पं. स. विभागीय अध्यक्ष अशोक लहाने, अजय तेजे, भिंगारचे माजी सरपंच निलेश पवार, रवींद्र शिसवे, सुनील पाटील उपस्थित होते.**


पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
शनिवार, दि. २९ जानेवारी २०२२ रोजी होणारे

कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस
(वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. क्रीडा संकुल, एच.ओ.सी., पनवेल
- ३. आयटीएम कॉलेज, नवीन पनवेल
- ४. सिडको समाज मंदिर, से. ५ ई (ना.पा.आ.के.४, कळंबोली)
- ५. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ६. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
- ७. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, से.२
- ८. ज्ञानसाधना केंद्र, सेक्टर ६, कामोठे
- ९. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग ॲण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
- १०. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
- ११. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
- १२. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)
- १३. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल
- १४. सेंट्रल रेल्वे, पनवेल
- १५. न्यू इंग्लिश स्कूल, कळंबोली
- १६. मनस्मृती रोटरी सेंटर, खारघर

कोव्हॅक्सिन

- १. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- २. काळण समाज हॉल, पनवेल
- ३. निमिषा हेल्थ सेंटर (पमपा), खारघर
- ४. आयटीएम कॉलेज, नवीन पनवेल
- ५. न्यू इंग्लिश स्कूल, कळंबोली

ग्रामीण लसीकरण

- जाधववाडी
- चाळ रा.जि.प. शाळा
- सागवाडी
- बिड रा.जि.प. शाळा
- तक्का प.म.पा. शाळा
- हैदरवाडी मंदिर
- रोडपाली, बौद्धवाडी
- रोडपाली कातकरवाडी मंदिर
- चाफेवाडी
- नौपाडा रा.जि.प. शाळा





**उलवे नोड : प्रजासत्ताक दिनानिमित्त सेक्टर १९ येथील भाजप कार्यालयात आयटी इंजिनियर जितेश काशिनाथ म्हात्रे यांच्या हस्ते ध्वजारोहण समारंभ झाला. या वेळी मोहा सरपंच मच्छींद्र कोळी, वहाळचे उपसरपंच अमर म्हात्रे, उलवेचे उपसरपंच जगदिश खारकर, माजी सैनिक निलेश म्हात्रे, एएसआय सागरी पोलीस अलंकार म्हात्रे, मदन पाटील, विक्रम कोळी, गीता ठाकूर, सुनंदा म्हात्रे, अमित नाईक, संतोष तुडमे, रवी शिंदे, मनोज नाईक, मोरादे, निलेश खोत, बामा नाईक, सयाजी चाळके, शुभम म्हात्रे, समाधान नाईक, नामदेव नाईक, मंगेश म्हात्रे, आयुष म्हात्रे, दापोलकर, सिल्व्हर हाईटचे सेक्रेटरी विशाल आदी उपस्थित होते.**

## दुखवटा

### बाळाराम पाटील

**पनवेल :** पनवेल तालुका पत्रकार महासंघाचे



अध्यक्ष तथा साप्ताहिक रायगड शिव सम्राटचे संपादक रत्नाकर पाटील यांचे वडील बाळाराम अंबू पाटील (आप्पा) शुक्रवारी (दि. २८) निधन झाले. त्यांचे वय ८३ वर्षे होते. त्यांच्या पश्चात चार विवाहित मुले, दोन विवाहित मुली, जावई, सूना, नातवंडे, पंतवंडे असा मोठा परिवार आहे. बाळाराम पाटील हे निवृत्त प्राथमिक शिक्षक होते. त्यांचा दशक्रिया विधी रविवारी (दि. ६) पेण तालुक्यातील रावे गावात पाताळगंगा नदीच्या तिरी होणार आहे, तसेच तेरावा विधी बुधवारी (दि. ९) रावे येथील घरी होणार आहे.

पान १ वरून


## भाजप नेते किरीट सोमय्यांचे कर्जतमध्ये आंदोलन

या वेळी सोमय्या यांनी माध्यमांशी बोलताना राज्य सरकार आणि ठाकरे कुटुंबावर टीका केली. त्यांनी हिंदू देवस्थानची जमीन मुस्लिम व्यक्तीच्या नावावर झाली कशी, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला, तसेच तीच जमीन चार महिन्यांनी श्रीदत्त पाटणकर या व्यक्तीच्या नावावर झाली आहे, अशी माहिती देत हे पाटणकर राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या पत्नी रश्मी ठाकरे यांचे भाऊ आहेत, असाही गौप्यस्फोट सोमय्या यांनी केला.

याचबरोबर सोमय्या यांनी घोटाळे, गैरव्यवहारप्रकरणी दाद मागूनही जिल्हा प्रशासन मागील सव्वा वर्षे केवळ टोलवाटोलवी करीत आहे, असा आरोप केला. कर्जत तहसील कार्यालयातून सोमय्या हे कर्जत-कल्याण राज्यमार्ग रस्त्यावर असलेल्या डी-मार्ट येथे पोहचले आणि त्यांनी तेथील रस्त्याच्या कडेला असलेल्या दुकानाच्या जमिनीची पाहणी केली.

## पनवेल भिंगारवाडीत रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन

बुथ अध्यक्ष रवींद्र शिसवे, सांगडे गाव अध्यक्ष भालचंद्र पाटील, माजी उपसरपंच तुळशीराम पाटील, माजी सदस्य रघुनाथ ठाकूर, गाव अध्यक्ष अशोक लहाने, शेडूंग सदस्य रवींद्र दुर्गे, मंगेश लहाने, संदेश लहाने, प्रवीण शिसवे, नरेश लहाने, प्रमोद ठाकूर आदी पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते. या वेळी सर्वांनी योगेश लहाने यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या.



## निवडक

### मोबाइल चोरणारा अटकेत

**पनवेल :** प्रवाशाचा मोबाइल फोन जबरीने खेचून पळून जाणाऱ्या जबरी मोहम्मद अश्फाक जाफर अली अन्सारी (रा. गोवंडी) आरोपीस वाशी रेल्वे पोलिसांनी पाठलाग करून रंगेहाथ पकडले आहे. तालुक्यातील उसलींगाव येथे राहणारा नवनाथ दत्तात्रेय पोस्तूरे, हा तरुण कुर्ला ते पनवेल असा लोकलने प्रवास करत होता. लोकलगाडी गोवंडी रेल्वे स्थानकात आली असता, ट्रेनमध्ये चढलेल्या मोहम्मद अन्सारी याने नवनाथ पोस्तुरे यांच्या हातातील मोबाइल फोन जबरदस्तीने खेचून तो पळून जाऊ लागला. या वेळी नवनाथने आरडाओरडा करताच पोलिसांनी प्रवाशांच्या मदतीने मोहम्मद अन्सारीला पाठलाग करून पकडले. अन्सारीविरोधात वाशी रेल्वे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून त्यास अटक करण्यात आली आहे.

### रोटरॅक्ट क्लबतर्फे कन्या दिवस

**पनवेल :** रोटरॅक्ट क्लब ऑफ पनवेल सेंट्रल ह्यांच्या वतीने कन्या दिवस म्हणून सॅनिटरी नॅपकीन व सेल्फ डिफेन्स हा उपक्रम करण्यात आला. रोटरॅक्ट क्लब ऑफ पनवेल सेंट्रल हा क्लब २६ डिसेंबर २०१६पासून कार्यरत आहे. वर्ष २०२१-२२ साठी क्लब अध्यक्ष प्रियांका कुलकर्णी या कार्यभार उत्तम प्रकारे सांभाळत आहे. वर्ष २०२१ सुरुवातीपासून क्लब ने ४५हून अधिक उपक्रम राबवले. क्लबला रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल ने नेहमी पाठिंबा दिला आहे. सॅनिटरी नॅपकीन व सेल्फ डिफेन्स च्या कार्यक्रमास अध्यक्ष प्रियांका कुलकर्णी, बोर्ड मेंबर्स युक्ता दीपक, कश्मिरा पन्हाळे, सिद्धी ठोके, श्रेयस जोशी आणि जेनरल बॉडी मेंबर्स सुमित शाह, अर्णव उरणकर, कौस्तुभ शेटे, राशी बोके आदी होते.



### नांदगाव परिसरात आढळले अर्भक

**पनवेल :** एक दिवसीय नवजात स्त्री अर्भकाच्या पालकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. तालुक्यातील नांदगाव येथील एकविरा मंदिराच्या शेजारी चाळीच्या पाठीमागील बाजूस एक दिवसीय स्त्री जातीच्या अर्भकास कोणीतरी अज्ञातांनी सोडून दिल्याने त्यांच्याविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला. याबाबत कोणालाही माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी क्रमांक २७४५२३३३ किंवा सहाय्यक निरीक्षक श्रीकांत शेडगे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन शहर पोलीस ठाण्याच्या वतीने करण्यात आले आहे.

### जेएनपीटीत ध्वजारोहण समारंभ

**उरण :** जेएनपीटी येथे भारताचा ७३वा प्रजासत्ताक



दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. जेएनपीटी प्रशासन भवन येथे झालेल्या या सोहळ्यात जेएनपीटीचे अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते. केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बलाच्या जवानांनी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व जेएनपीटीचे अध्यक्ष संजय सेठी यांना सलामी दिली. संजय सेठी यांच्या हस्ते ध्वजारोहण करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. या वेळी जेएनपीटीचे उपाध्यक्ष उन्मेष वाघ, भा.रा.से. आणि सर्व विभागांचे विभागाध्यक्ष उपस्थित होते. या वेळी संजय सेठी यांनी जेएनपीटीचे सर्व कर्मचारी, कामगार, विश्वस्त आणि भागधारकांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

### जेलमधील कर्मचाऱ्यांना कर्ज मंजूर

**पनवेल :** बँक ऑफ महाराष्ट्र या बँकेने प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून देशसेवा करणाऱ्यांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी तळोजा कारागृहामध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांना कर्ज मंजूर केले व बँक अधिकाऱ्यांनी सदिच्छा भेट दिली. या वेळी उपस्थित बँकेच्या महाप्रबंधक व नवी मुंबईच्या झोनल मॅनेजर अपर्णा जोगळेकर, तळोजा कारागृहाचे अधीक्षक यु,टी.पवार, बँकेचे उप अंचल प्रबंधक अमित सुतकर, मुख्य प्रबंधक, मनीषा शर्मा, दिलीपकुमार उपाध्याय, शाखा प्रबंधक, प्रिया सिंग व अधिकारी प्रसेनजीत अंकुश, प्रथमेश मलाईकर, पूजन झा, गोपीचंद पाटेकर व अरविंद मोरे उपस्थित होते.





**पनवेल : कोरोना काळात अविरतपणे जेवणाचे डबे घरपोच देण्याचे कार्य करणाऱ्या प्रज्ञा पेंडसे यांना प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून रोटरी क्लब ऑफ पनवेल यांच्या वतीने व्होकेशनल सर्व्हिस एक्सलन्स ॲवॉर्ड देऊन गौरविण्यात आले.**

# नवी मुंबईतील विस्तारित गावठाणाचे लवकरच सर्वेक्षण

## आमदार मंदा म्हात्रेंचा पाठपुरावा; जिल्हाधिकाऱ्यांसोबत बैठक

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील विस्तारित गावठाणातील थांबविण्यात आलेले सिटी सर्वेक्षण पुन्हा सुरू करून ग्रामस्थांच्या घरांना प्रॉपर्टी कार्ड मिळावे, याकरिता बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या आमदार मंदा म्हात्रे यांची ठाणे जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर यांच्यासोबत नुकतीच बैठक झाली. जिल्हाधिकारी नार्वेकर यांनीही सकारात्मक निर्णय घेत नवी मुंबईतील गावठाणांचे सिटी सर्वेक्षण लवकरात लवकर सुरू करण्याचे सूचित केले.



कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सिटी सर्वेक्षणास सुरुवात होऊ शकली नाही. लवकरच मे. टेक्नोम अर्बन मॅनेजमेंट कन्सल्टंट अ‍ॅण्ड सर्व्हिस प्रोवायडर्स एजन्सीला आदेश देण्यात येतील, असेही जिल्हाधिकारी यांनी आमदार मंदा म्हात्रे यांना सांगितले. नवी मुंबईतील विस्तारित गावठाणातील घरांचे सिटी सर्वेक्षण करून प्रॉपर्टी कार्ड मिळण्याबाबतचा प्रश्न अनेक वर्षे प्रलंबित आहे. सिटी सर्वेक्षणास शिदोरे अ‍ॅण्ड शिदोरे कंपनीमार्फत बेलापूर गावातून सुरुवात करण्यात आली होती. अर्धेअधिक सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर काही कारणास्तव हे सर्वेक्षण बंद करण्यात आले. त्यानंतर पुन्हा मे. टेक्नोम अर्बन मॅनेजमेंट कन्सल्टंस अ‍ॅण्ड सर्व्हिस प्रोवायडर्स या एजन्सीमार्फत ७ मार्च २०२०पासून दिवाळे, सारसोळे व सानपाडा या गावठाण क्षेत्रातून सिटी सर्वेक्षण सुरू करण्याचे जिल्हाधिकारी यांनी आदेश देऊनही आजपर्यंत त्यास सुरुवात करण्यात आलेली नाही. याबाबत पाठपुरावा केला असता कोरोना लॉकडाऊनमुळे सिटी सर्वेक्षणास सुरुवात होऊ न शकल्याचे समजले, परंतु सद्यस्थितीत कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाला असून शासनाचे सर्व नियम पाळून सिटीसर्वेक्षण सुरू करण्यास हरकत नसल्याने पुढील कार्यवाही केल्यास उचित होणार आहे.

ग्रामस्थांमध्येही याबाबत संभ्रम निर्माण होत असून या सिटी सर्वेक्षणास पुन्हा सुरुवात करून त्यांना त्यांच्या हक्काचे प्रॉपर्टी कार्ड दिल्यास खऱ्या अर्थाने त्यांना न्याय मिळेल. म्हणून नवी मुंबईतील विस्तारित गावठाणातील थांबविण्यात आलेले सिटी सर्वेक्षण पुन्हा सुरू करून त्यांच्या घरांचे प्रॉपर्टी कार्ड देण्यात यावे याकरिता ही बैठक आयोजित करण्यात आली होती. या वेळी भाजप महामंत्री डॉ. राजेश पाटील, विजय घाटे, माजी नगरसेवक सुनील पाटील उपस्थित होते.

### '...अन्यथा भूमिपुत्रांचे प्रश्न कधीच सुटणार नाही'


नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तांच्या विस्तारित गावठणाचा प्रश्न कायम आहे. विस्तारित गावठाणांचे सर्वेक्षण करण्यासठी मी कायम पाठपुरावा करत आले आहे. हा विषय पटलावरदेखील मी आणला आहे. त्यास यश येऊन लाखो भूमिपुत्रांना त्याचा फायदा होणार आहे. विस्तारित गावठाणांचे सर्वेक्षण होऊन भूमिपुत्रांना प्रॉपर्टी कार्ड मिळून ते जागेचे मालक होणार आहेत. मध्यंतरी हे सर्वेक्षण सुरू झाले होते, मात्र त्याविषयी गैरसमज पसरवण्यात आले होते. त्यामुळे ते बंद पाडण्यात आले. सर्वेक्षण झाल्याशिवाय भूमिपुत्रांचे प्रश्न कधीच सुटणार नाहीत. त्यामुळे दिशाभूल करणाऱ्यांपासून भूमिपुत्रांनी सावध राहावे, असे आमदार मंदा म्हात्रे यांनी आवाहन केले आहे.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिन साजरा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघरमधील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील आजीवन आणि विस्तार विभागाच्या वतीने राष्ट्रीय मतदार दिवस (दि. २५) साजरा करण्यात आला. या कार्यक्रम साजरा करण्यासाठी आभासी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

या व्याख्यानासाठी ऑरो विद्यापीठ सुरत (गुजरात) येथील डॉ.सुमेध लोखंडे हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. या वेळी प्राचार्य डॉ. संजय मराठे यांनी प्रस्तावनेत मतदानाचे वैशिष्ट्य पटवून दिले. या वेळी सर्व प्राध्यापक वृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या व्याख्यानामध्ये डॉ. सुमेध लोखंडे यांनी लोकशाहीतील मतदाराचे महत्त्व आणि कर्तव्य समजावून दिले.




महाविद्यालयाच्या बीएमएस विभागाच्या प्रा. अंकिता जांगिड यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रा. मीनल मांडवे यांनी अतिथीचे स्वागत केले तर प्रा. महेश धायगुडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना मतदान करणे लोकशाहीत गरजेचे आहे हे नमुद केले.संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.

## पनवेलमध्ये विद्युत वाहिन्या भूमिगत करण्याचे काम सुरू

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिका हद्दीतील प्रभाग क्र. १८मधील आशियाना सोसायटी ते विरुपाक्ष हॉलपर्यंत विद्युत वाहिन्या भूमिगत करण्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. या प्रभागाचे नगरसेवक विक्रांत पाटील यांनी हा विषय मार्गी लावण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न केले आहेत.



**नगरसेवक विक्रांत पाटील यांच्या प्रयत्नांना यश**

स्वातंत्र्यवीर सावरकर चौक ते अमरधाम या रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. विरुपाक्ष हॉल ते आशियाना सोसायटीपर्यंत तीन विद्युत खांब रस्त्याच्या मधोमध आले खांब धोकादायक ठरू लागले होते व त्यामुळे तिथे दुर्घटना झाल्या होत्या. या विषयाचा सततचा पाठपुरावा आणि अधिकाऱ्यांच्या मागे लागल्याने नगरसेवक विक्रांत पाटील यांच्या प्रामाणिक प्रयत्नांना अखेर यश आले आहे.

आशियाना सोसायटी ते रिलायन्स फ्रेश पर्यंतचे विद्युत वाहिन्या भूमिगत करण्याचे कामही मंजूर करून घेण्यात आले आहे आणि लवकरच या कामालाही सुरुवात होणार असल्याचे विक्रांत पाटील यांनी सांगितले. या कामाची यशस्वी सुरुवात केल्याबद्दल नागरिकांनी कार्यक्षम नगरसेवक विक्रांत पाटील यांचे आभार मानले आहेत.

## फडके विद्यालयात प्रजासत्ताक दिन



**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

म. ए. सो.च्या नवीन पनवेलमधील आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके विद्यालयात भारताचा ७३वा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला.

या वेळी भांडारकर इन्स्टिट्यूटचे डायरेक्टर, संशोधक डॉ. प्रमोद जोगळेकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मराठी माध्यम, माध्यमिक विभागाच्या मुख्याद्यापिका मानसी वैशंपायन यांच्या हस्ते तिरंगा फडकवण्यात आला. डॉ. जोगळेकर यांच्या हस्ते भारताच्या अमृतमहोत्सवी वर्षाच्या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील अप्रसिद्ध नायकांच्या कार्यावर प्रकाश टाकणाऱ्या विद्यालयाच्या 'संवाद' व इंग्रजी माध्यमाच्या 'रिफ्लेक्शन' या पाक्षिकांच्या विशेष अंकाचे प्रकाशन करण्यात आले.

मुख्याध्यापिका मानसी वैशंपायन आणि प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका नीशा देवरे यानी उपस्थितांशी संवाद साधला. या वेळी सर्व माध्यमांचे मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व सेवक वर्ग उपस्थित होते. सर्व विद्यार्थी, माजी विद्यार्थी, पालक यांनी ऑनलाइन उपस्थित राहून ध्वजास मानवंदना दिली.

## उरणमध्ये भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन

**उरण : वार्ताहर**

शहरातील राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व उरण व्यापारी असोसिएशनच्या वतीने प्रजासत्ताक दिनानिमित्त बुधवारी (दि. २६) सकाळी गणपती चौक येथे आमदार महेश बालदी यांच्या हस्ते भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

या वेळी उद्योगपती अशोक बालदी, हस्तीमल मेहता, पुरुषोत्तम सेवक, हितेश शाह, मनन पटेल, अजित भिंडे, आकाश शाह, विशाल पाटेकर, गोपाळ कुमावत, स्वप्नील रावते, अभिषेख जैन, जिगर ठक्कर, विष्णू सेवक, संतोष साळवी, नवीन जैन, नवीन कोटक, रौनक सेवक, बाबूलाल शाखला, चंद्रप्रकाश मेहता, सुरेश, दिगंबर, संघाचे कार्यकर्ते व व्यापारी असोशिएशनचे कार्यकर्ते आदी उपस्थित होते.



## पनवेल पोस्ट ऑफिसतर्फे प्रजासत्ताक दिन उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई डाक विभागामार्फत पनवेल हेड पोस्ट ऑफिसच्या प्रांगणात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी डायरेक्टर ऑफ पोस्टल सर्विसेस, नवी मुंबई रीजन सरण्या यु यांच्या हस्ते ध्वजारोहण पार पडले.




या कार्यक्रमात स्माइल्स फाउंडेशनच्या वतीने कर्मचाऱ्यांच्या मुलांना 'बायजूस ई-लर्निंग'ची मोफत सदस्यता प्रदान करण्यात आली. त्याचप्रमाणे डाक विभागातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना उत्कृष्टता प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

प्रजासत्ताक दिन कार्यक्रमासाठी नवी मुंबई डाक विभागाचे वरिष्ठ अधीक्षक डॉ. अभिजित इचके, स्माईल्स फाउंडेशनचे डॉ. धीरज आहूजा, उमा आहूजा आणि नवी मुंबई डाक विभागातील कर्मचारीवर्ग यांची उपस्थिती होती.

## लिमये महाविद्यालयामध्ये मतदार व प्रजासत्ताक दिन

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

कळंबोली येथील शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिन व प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. मतदार दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, तसेच २४ व २५ जानेवारी रोजी निबंध लेखन, घोषवाक्य लेखन आणि वक्तृत्व स्पर्धा अशा विविध स्पर्धा आयोजित केल्या होत्या.



या वेळी पनवेल महापालिकेचे उपायुक्त विठ्ठल डाके, संपर्क अधिकारी विजय चव्हाण, प्राचार्य डॉ. एस. सी. लहुपचांग यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रास्ताविक एनएसएसचे जिल्हा समन्वयक डॉ. बी. बी. जाधव यांनी केले. स्पर्धेतील विजेत्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेमधील स्वयंसेविका मंजुश्री सुळे हिने केले. राष्ट्रगीत स्वयंसेविका कोमल जाधव हिने सादर केले. स्वयंसेविका स्नेहा कुंभार हिने उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रम संयोजन डॉ. बी. बी. जाधव, डॉ. भारती आरोटे व अनिता मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली एनएसएस स्वयंसेवकांनी प्रयत्न केले.

प्रजासत्ताक दिनानिमित्ताने महाविद्यालयात शासनाने कोविड-१९ संबंधी घालून दिलेले सर्व नियम पाळून ध्वजारोहण करण्यात आले. या वेळी प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## नवीन पनवेलमध्ये रक्तदान शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून रोटरी ब्लड बँक (पतपेढी), नवीन पनवेल यांच्यामार्फत आणि रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाऊन, गार्डन व्हॉलीबॉल लीग नवीन पनवेल, संत शिरोमणी रोहिदास विकास मंडळ, ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने नवीन पनवेलमध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. एकूण ४१ रक्तदात्यांनी या वेळी रक्तदान केले. ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्राचे अध्यक्ष व गार्डन व्हॉलीबॉल लीगचे संस्थापक अध्यक्ष किसन पवार, रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाऊनचे अध्यक्ष गुरुदेव सिंग कोहली, सेक्रेटरी व्ही. एल. गुरमे, संत शिरोमणी रोहिदास विकास मंडळाचे अध्यक्ष कृष्णा गायकवाड, सेक्रेटरी श्री. पुगावकर, ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्राचे सेक्रेटरी बेलापूरकर, गार्डन व्हॉलीबॉल लीगचे सेक्रेटरी घोंगडे यांनी पुढाकार घेऊन हा उपक्रम राबविला.

या वेळी विरजी पटेल, राधाभाई, नरशी भाई, स्वप्नील पवार, गणेश पटेज, दिनेश, प्रशाद चांदोरकर, माने, राठोड, फिरोज, भिमराव, सत्या, पाटील, पणाले, कानपिळे, पाल, आबोकर, श्रीवास्तव, जाधव, ॲड. पिंजारी, तरेकर, मारुती रोकडे, ज्ञानेश्वर जोशी, गणेश, रवान, जाधव, कांबळे, डॉ. भंडारकर, निलेश पोटे आदी उपस्थित होते.



## संपादकीय

# सर्वोच्च दणका

भाजपच्या आमदारांच्या निलंबनापाठीमागची महाविकास आघाडी सरकारची सूडबुद्धी लपून राहिली नव्हती. माननीय राज्यपालांकडे प्रलंबित असलेल्या विधानपरिषद सदस्यांच्या १२ जणांच्या यादीबाबत जशास तसे उत्तर देण्याच्या नादात महाविकास आघाडीचे नेते वाहावत गेले, परिणामी शुक्रवारी महाविकास आघाडी सरकारला सर्वोच्च चपराक खावी लागली. आता विधिमंडळाचे सार्वभौम अधिकार कुठले आणि न्यायपालिकेचा विधिमंडळाच्या कामकाजातील हस्तक्षेप योग्य मानायचा का, असा नवीनच वाद सत्ताधारी आघाडीने उकरून काढला आहे. गिरे तो भी टांग उपर यातीलच हा प्रकार मानावा लागेल.

**विधिमंडळ सभागृह हे सार्वभौम असते असे लोकशाही व्यवस्थेत श्रद्धापूर्वक मानले जाते. भारतीय संविधानातदेखील तसा आग्रहपूर्वक उल्लेख करण्यात आला आहे, परंतु सार्वभौम याचा अर्थ अनिर्बंध किंवा अमर्याद असा होत नाही. महाविकास आघाडी सरकारचे नेमके हेच भान सुटले. विधिमंडळाच्या गेल्या पावसाळी अधिवेशनात अध्यक्षांच्या दालनामध्ये जो गोंधळ झाला, त्यानंतर भारतीय जनता पक्षाच्या १२ आमदारांना तडकाफडकी एक वर्षासाठी निलंबित करण्यात आले. अध्यक्षांचा हा निर्णय सर्वस्वी अनाकलनीय होता. या निर्णयाच्या विरोधात भाजपने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली, त्याचा निकाल शुक्रवारी लागला. विधानसभा अध्यक्षांनी केलेले बारा आमदारांचे निलंबन माननीय सर्वोच्च न्यायालयाने घटनाबाह्य ठरवले आहे. कुठलाही मतदारसंघ सहा महिन्यांपेक्षा अधिक काळ लोकप्रतिनिधित्वापासून वंचित ठेवला जाऊ शकत नाही. इतकेच नव्हे तर एखादा लोकप्रतिनिधी साठ दिवसांपेक्षा अधिक काळ सभागृहात गैरहजर राहिल्यास त्याचे सदस्यत्व रद्द होऊ शकते असे घटनेत नमूद करण्यात आले आहे. घटनेतील या तरतुदीलाच धाब्यावर बसवून महाराष्ट्रातील सत्ताधाऱ्यांनी प्रचंड मोठी चूक केली. एक वर्षापेक्षा अधिक काळाचे निलंबन अन्यायकारक होते हे तर आधीच उघड झाले होते. विरोधीपक्षाचे १२ आमदार वर्षभरासाठी घरी बसवून विरोधी आवाज दडपता येईल हा भ्रम सरकारला नडला आहे. कुठल्याही विधिमंडळ सदस्याला अमर्याद काळासाठी निलंबित ठेवता येत नाही. या प्रवृत्तीमुळे घातक पायंडा पडेल हे वेगळे सांगायची गरज नाही. आपल्या सोयीच्या आमदारांचे सदस्यत्व शाबूत ठेवायचे आणि गैरसोयीच्या सदस्यांना सभागृहाच्या बाहेर ठेवून त्यांची तोंडे गप्प करायची हे कुठल्या लोकशाहीत बसते? असे होऊ लागल्यास निवडणुकांना काही अर्थच उरणार नाही. उदाहरणार्थ, अडचणीचे प्रश्न विचारणाऱ्या एखाद्या लोकनियुक्त प्रतिनिधीला दोन-तीन वर्षांसाठी सभागृहात येण्यास मनाई केली तर त्याच्या आमदारकीला अर्थ काय उरला? त्याच्या मतदारसंघातील नागरिकांनी आपल्या प्रश्नांची तड लावण्यासाठी कोणाकडे जायचे, यासारखे गंभीर प्रश्न निर्माण होतील. सर्वोच्च न्यायालयाने लोकशाहीतील नेमक्या याच मूलभूत तत्त्वावर बोट ठेवले. भारतीय लोकशाहीतील हा एक ऐतिहासिक निवाडा मानला जातो आहे, तो यासाठीच. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या सुस्पष्ट निकालानंतर भाजपच्या १२ आमदारांचे निलंबन रद्द होऊन त्यांचा सभागृहात परत येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. लोकशाहीच्या गप्पा मारणाऱ्या महाविकास आघाडी सरकारचे खरे रूप यामुळे उघड झाले. निव्वळ बहुमताच्या आकड्यांच्या जोरावर भ्रष्ट वर्तन करता येईलही, परंतु संविधानाला बगल देणे शक्य नाही हेच या निकालातून स्पष्ट झाले. अर्थात, या निकालामुळे महाविकास आघाडीचे तोंड फुटले असले तरी त्यांना त्याची फारशी फिकिर नाही, कारण काहीही करून सत्तेच्या खुर्चीला घट्ट चिकटून राहावयाचे हा एककलमी कार्यक्रम त्यांच्यापुढे आहे.**

# प्राचीन पल्लीपुर (पाली)

## खबरबात
धम्मशील सावंत

सरसगडाच्या कुशीत, बल्लाळेश्वराच्या कृपाशीर्वादाखाली आणि अंबा नदीच्या तीरावर विसावलेले गाव म्हणजे पाली. दैदिप्यमान इतिहास अनुभविलेल्या आणि आधूनिक काळात विकासाच्या वाटेवर असलेल्या पाली गावाने अनादिकाळापासून अनेक स्थित्यंतरे अनुभवली आहेत. ऐतिहासिक, धार्मिक आणि स्वतंत्र चळवळीचा वारसा लाभलेल्या या गावाची रंजक ओळख...

घाटमाथ्यावरवरुन कोकणात उतरताना प्रमुख ठाण्याला पोहोचण्यापूर्वी ज्या भागात तळ द्यायचा त्याला 'पाल' पडणे म्हणजे 'तळ पडणे' असे म्हणत. येथे अशा प्रकारचे पाल पडत. त्यामुळेच या गावाचे नाव 'पाली' पडले असावे. फार पूर्वी या गावाला पल्लीपूर, पल्लीपतन व नागस्थान अशीही नावे होती.



अष्टविनायकांपैकी एक बल्लाळेश्वर देवस्थान हे रायगड जिल्ह्यातील पाली या गावी आहे. हे प्राचीन देवस्थान असून अत्यंत रमणीय व सर्वांगसुंदर असे स्थान आहे. श्री बल्लाळेश्वराचे कथेचा उल्लेख श्री गणेश पुराण अध्याय २२/२३ (उपासना खंड) व मुद्गल पुराण खंड ८ अध्याय ३८/३९ यांत वर्णिला आहे. पाली या गावाचे नाव पूर्वी पल्लीपूर असे होते व येथील भक्त बल्लाळ याने अंतकरण पूर्वक केलेल्या भक्तीमुळे गणपती ब्राम्हण रुपात त्यांच्यासमोर प्रकट झाले. त्यामुळे बल्लाळाने वर मागताना गणपतीकडे प्रार्थना केली की, तुम्ही माझ्या नावाने येथे वास्तव्य करावे व तुमची मनोभावे प्रार्थना केल्यावर भक्तांच्या इच्छा पूर्ण कराव्यात. त्यामुळे सदर स्थानास बल्लाळेश्वर असे म्हटले जाते व नवसाला पावणारा गणपती असे म्हटले जाते, अशी आख्यायिका आहे.

**❋ मंदिराची सुरेख रचना ❋**

श्री बल्लाळेश्वर मंदिर हे फार पूर्वी लाकडी होते. त्यानंतर नाना फडणीसांनी सदर मंदिराचा जीर्णोध्दार करून इ.स.१७७० च्या सुमारास पाषाणी मंदिर बांधले. हे मंदिर पुर्वाभिमुख आहे. दक्षिणायनात सूर्योदय होताच सूर्याची किरणे नेमकी श्रींवर पडतात. मंदिरास दोन गाभारे असून आतील गाभारा विस्तृत आहे. त्यात श्रींची स्वयंभू मुती आहे. पुढील गाभाऱ्यात श्रींच्या समोर उंदीर बसवण्यात आला आहे. मंदिराचे संपूर्ण बांधकाम बारा फुट रुंदीच्या दगडात केले असून प्रत्येक सांध्यावर शिसे ओतण्यात आले आहे. सभामंडपासमोर मोठी घंटा असून सदरची घंटा चिमाजीआप्पा पेशवे यांनी वसई किल्ला जिंकला त्यावेळी सोडविलेल्या लुटीपैकी असून ती पेशव्याकडून सदर मंदिरास दिली गेली आहे. १९५२ मध्ये मुंबई सार्वजनिक विश्वस्त कायदा अस्तित्वात आल्यावर सदर मंदिराची नोंदणी सार्वजनिक धार्मिक संस्था म्हणून झाली. संस्थेचा कारभार सुव्यवस्थित व्हावा म्हणून १९९१ मध्ये संस्थेची योजना मंजूर झाली. या योजनेनुसार संस्थेचा कारभार व्यवस्थित चालू आहे.

**❋ पालीचे ऐतिहासिक प्रतीक- सरसगड किल्ला ❋**

प्राचीन ऐतिहासिक व धार्मिक वारसा लाभलेले पाली हे गाव सरसगडाच्या कुशीत वसले आहे. शिवाजी महराजांनी या गडाचे महत्व ओळखून गडास स्वराज्यात दाखल करुन घेतले. आणि सरसगडाच्या दुरुस्तीसाठी दोन हजार होन मंजूर केल्या होत्या. यानुसार दुर्गमाता व विपूल जलसंचय यावर विशेष भर देवून गडाची बांधणी करण्यात आली. दूरवर टेहाळणी करण्यास व इशारा देण्यास सरस म्हणून किल्ल्यास सरसगड नाव देण्यात आले.


पालीतून किल्यावर पोहचायला साधारण एक तास लागतो. अग्निजन्य खडकापासून बनलेल्या या किल्ल्याची उंची समुद्रसपाटीपासून ४९० मिटर आहे. किल्ल्याच्या दक्षिण बाजुकडील १११ पायऱ्या सलग एकाच दगडात घडविलेल्या असून त्या उंच व प्रशस्त आहेत. चुना व घडीव दगडांचा उपयोग करुन किल्ल्याला बुरुज व तटबंदी करण्यात आली आहे. दक्षिणेकडील दरवाजा दिंडी दरवाजा म्हणून ओळखला जातो. उत्तरेकडून किल्ला चढून गेल्यावर प्रवेशद्वाराजवळ मोती हौद आहे. या हौदातील पाणी अतिशय थंड व स्वच्छ असून ते बारामाही उपलब्ध असते. या हौदाची खोली तीन मिटर आहे. किल्ल्यावर घोड्याची पागा, धान्य कोठारे, शस्त्रागारे, कैदखाने, दारू कोठारे व देवळ्या बांधण्यात आली आहेत. तोफा व बंदूकांचा वापर करण्यासाठी बुरुज व तटास अनेक छिद्रे (जंग्या) ठेवण्यात आली आहेत. बालेकिल्ल्यावर जागेचे क्षेत्रफळ अर्धा हेक्टर आहे. या जागेत जोगेश्वरी (केदारेश्वर) मंदिर व त्याभोवती तळे आहे. तसेच शहापिर दर्गा आहे. वैशाख पोर्णिमेला दर्ग्याचा उरुस भरतो तर श्रावणी सोमवार व महाशिवरात्रीला केदारेश्वराच्या दर्शनासाठी किल्ल्यावर भाविकांची गर्दी असते. सरसगड किल्ल्याचाच भाग असलेला सलग दगडांचा एक जुळा किल्ला पाठिमागे उभा आहे. या भागास तीन कावडी असे म्हणतात.

१९६२ साली पंचायतराज व्यवस्थेची निर्मिती झाल्यावर कुलाबा जिल्हा परिषदेचे पहिले अध्यक्ष म्हणून पालीचे के. गो. तथा दादासाहेब लिमये यांची निवड झाली.

**❋ शिक्षणाचा वारसा ❋**

हरी लागू, गणपतराव वडेर, ल.के. भावे, दादासाहेब माने आदिंसह अनेकांना स्वातंत्र्य पुर्व काळात पालीला इंग्रजी शाळा स्थापन केली. जानेवारी १९४१ मध्ये ही शाळा सुधागड एज्युकेशन सोसायटी म्हणून रजिस्टर झाली. १९६७ साली दादासाहेब लिमये सुधागड एज्यकेशन सोसायटीचे अध्यक्ष झाले. त्यांनीच कुलाबा जिल्हा आदिवासी सेवा मंडळाची स्थापना केली आहे. या दोन्ही संस्थांच्या शाळा, महाविद्यालयांमधून हजारो मुले ज्ञानाचे धडे गिरवीत आहेत. पालीतील दानशूर शिक्षणप्रेमी जमशेटजी नवरोजी पालीवाला यांच्या नावाने १९८९ मध्ये कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालय सुरु झाले. आज येथे आजूबाजूच्या गावातील व तालुक्यातील हजारो विद्यार्थी उच्च शिक्षण घेत आहेत.

स्वातंत्र्यलढा आणि छोडो भारत आंदोलनातही पालीकरांचा सहभाग होता. ब्रिटीश सरकारला प्रतिकार करण्यासाठी पालीतील राजाभाऊ चांदवडकर यांनी १९३० मध्ये आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने तारांचे खांब कापून टाटा कंपनीकडून मुंबईला होणारा वीजपुरवठा बंद केला होता. रामजीभाई मेहता १९२१ च्या मुळशी सत्याग्रहात सेनापती बापट यांना मदत केली होती. चले जाव आंदोलनामध्ये पाली गावात सत्याग्रह करण्यात आला होता. यावेळी बापुसाहेब लिमये, रामजीभाई मेहता व अन्य सत्याग्रहींना उन्हेरे येथे अटक झाली होती. त्याचबरोबर पुरुषोत्तम लिमये, धोंडू ढेबे, शांताराम मुळे, वसंत दुर्वे, सिद्धेश्वर कोनकर यांनाही स्वातंत्र्य लढ्यात सहभाग घेतल्याबद्दल कारावास झाला होता. केदारनाथ कुलकर्णी यांनी छोडो भारत आंदोलनात भाई कोतवाल यांच्या पथकातील भूमिगत क्रांतीकारांना मार्गदर्शन केले होते.



# कर्जतमध्ये प्रजासत्ताक दिनानिमित्त विविध उपक्रम

**कर्जत : प्रतिनिधी**

प्रजासत्ताक दिनानिमित्त राष्टीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समितीच्या वतीने कर्जत तालुक्यातील जांभुळवाडी, नागिरेवाडी आणि पुलाचीवाडी या वनवासी वाड्यांवर बुधवारी (दि. २६) भारतमाता पूजनाचे कार्यक्रम करण्यात आले.

जनकल्याण समितीचे जिल्हा कोषाध्यक्ष संजीव दातार, संघाचे तालुका कार्यवाह संतोष देशमुख, तालुका व्यवस्था प्रमुख माहेश निगोजकर, तालुका बौद्धिक प्रमुख बळीराम डोंगरे, समितीचे कार्यकर्ते भगवान भगत, ग्रामस्थ कुमार गंगावणे, अतुल काळोखे, आरोग्यरक्षक पंढरी पसाळ, रवी भोई उपस्थित होते. संजीव दातार व संतोष देशमुख यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना भारतमाता पूजन कार्यक्रमाविषयी माहिती सांगितली.



(छाया : विनायक माडपे)

**कर्जत : बातमीदार**

नेरळ येथील अॅड. गजानन डुकरे (वय ४७) यांनी ७३व्या प्रजासत्ताक दिनी सायकलवरून ७३ किमी अंतर तीन तासात पार करीत शहीद जवानांना अनोखी आदरांजली वाहिली.

अॅड. डुकरे यांनी बुधवारी सकाळी सव्वा सात वाजता नेरळ येथील आपल्या घरापासून सायकल प्रवासाला सुरूवात केली. नेरळ ते कर्जत मार्गावर दोन आणि नेरळ ते वांगणी एक फेरी असा तीन तासात एकूण ७३ किलोमीटर सायकल प्रवास त्यांनी केला. त्यांचे स्वागत करण्यासाठी त्यांचा मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.



(छाया : संतोष पेरणे)



**कर्जत : बातमीदार**

कल्याण-कर्जत राज्यमार्गावर असलेल्या माथेरान नाक्यावरील हुतात्मा चौकात बुधवारी टॅक्सी संघटनेचे अध्यक्ष सनी चंचे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या वेळी इंडियन फ्लॅग रेसमध्ये सहभागी झालेल्या अनेक हौशी सायकलपटूंनी तिरंग्याला अभिवादन केले.

ध्वजारोहणाच्या सुरुवातीला इंडियन फ्लॅग सायकल रेसमधील ६५ ते ७० वर्षीय सायकलपटूंच्या हस्ते हुतात्मा भाई कोतवाल आणि हिराजी पाटील यांच्या अर्धपुतळ्यांना अभिवादन करण्यात आले. महिला सायकलपटू यामिनी येवले यांनी प्रजासत्ताक दिनाबद्दल माहिती देणारे भाषण केले.

हुतात्मा समितीचे अध्यक्ष संतोष पेरणे, उपाध्यक्ष दर्वेश पालकर, गणेश पवार, अजय गायकवाड, सदस्य बंडू शिरसागर, सुमित शिरसागर, विजय शिर्केम तसेच टॅक्सीचालक आणि पर्यटक उपस्थित होते.

# वीटभट्टीवरील शाळेतील विद्यार्थ्यांना उबदार कपडे आणि खाऊचे वाटप

**कर्जत : बातमीदार**

नेरळजवळील दामत गावातील वीटभट्टीवरील आदिवासी मुलांच्या शाळेतील ३३ विद्यार्थ्यांना कर्जतचे व्यापारी किरण परमार यांनी उबदार कपडे आणि खाऊचे वाटप केले.

नेरळ विद्या मंदिर कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षण घेणारी भाविका जामघरे हिने दामत येथील आठ वीटभट्टीवर काम करणाऱ्या स्थलांतरित आदिवासी कातकरी समाजाच्या मुलांसाठी शाळा सुरु केली आहे. या शाळेची माहिती सोशल मीडियावर प्रसारीत झाल्यानंतर किरण परमार यांनी दामत येथील वीटभट्टीवरील शाळेत जाऊन तेथील पहिली ते सातवीच्या ३३ मुलांना भेटवस्तू, उबदार कपडे आणि खाऊचे वाटप केले. यावेळी संतोष पेरणे, किशोर गायकवाड आणि भगवान जामघरे उपस्थित होते.



# पर्यटकांना वाचवणारे पोलीस शिपाई प्रशांत लोहार यांचा मुरूडमध्ये सत्कार

**मुरूड : प्रतिनिधी**

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून मुरूडमधील पद्मदुर्ग व्यवसायिक कल्याणकारी मंडळाने पर्यटकांना वाचवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करणाऱ्या पोलीस शिपाई प्रशांत लोहार यांचा सत्कार केला.

काशीद समुद्र किनारी बुडत असणाऱ्या पुणे येथील तीन पर्यटकांना वाचवण्यासाठी प्रशांत लोहार यांनी शर्थीचे प्रयत्न करून जीवरक्षक व स्पीड बोटीची मदत घेत त्यांचे प्राण वाचवले होते. या कामगिरीची दखल घेऊन जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाने लोहार यांचा सत्कार केला होता. प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून पद्मदुर्ग व्यवसायीक कल्याणकारी मंडळाचे अध्यक्ष अरविंद गायकर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुछ व प्रमाणपत्र देऊन पोलीस शिपाई लोहार यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संघटनेचे अध्यक्ष अरविंद गायकर, मुरूड पोलीस ठाण्याचे निरीक्षक नितीन गवारे, दामोदर खारगावकर, शैलेश वारेकर, महेंद्र पाटील, ज्योती मसाल व पोलीस कर्मचारी उपस्थित होते.



(छाया : संजय करडे)

## आरोग्य प्रहर

# थंडीत कोवळ्या उन्हात बसा आणि मिळवा अनेक फायदे

हिवाळी मोसमात कोवळ्या उन्हात बसण्याचे खूप फायदे आहेत. कुडकुडत्या थंडीत तुम्हाला जेव्हा वेळ मिळेल तेव्हा तुम्ही कोवळ्या उन्हात जरूर बसायला पाहिजे. त्यामुळे तुमच्या शरिराला व्हिटॅमिन डी मिळते. यामुळे तुमची हाडे अधिक मजबूत होतात.

याशिवाय कोवळ्या उन्हात मोठ्या प्रमाणात आयर्न असते. शरीरातील कमी असणारे आयर्न भरून निघण्यास मदत करते. त्वचेचा संसर्ग, अशक्तपणा, थकवा, कॅन्सर, टीबी आदी विकारांना कमी आर्यन मुळे सामोरे जावे लागते, परंतु हे सगळे विकार कोवळ्या उन्हाने कमी होऊ शकतात.



सूर्याच्या कोवळ्या उन्हामुळे हृदयदेखील चांगले राहते. यासगळ्याबरोबरच उन्हात बसण्यापूर्वी तुम्ही आणखी काही गोष्टींची काळजी घेतली पाहीजे. ते म्हणजे जर तुम्हाला उन्हात बसून घाम आला तर जास्त वेळ तेथे थांबू नये. दुपारी शक्यतो उन्हात बसू नये, असे फ्रान्सच्या हार्ट डिसिस स्पेशलिस्ट मार्सेल पोगोलो यांनी म्हटले आहे.

काही वैज्ञानिकांनी असेदेखील सांगितले आहे, सूर्याची कोवळी किरणे तुम्हाला फक्त शरीराच्यावरूनच नाही तर आतून देखील चांगले पोषकतत्व देतात.

दररोज ५-१५ मिनिटे सूर्यप्रकाशात बसणे शरीरातील व्हिटॅमिन डीची पातळी वाढवण्यासाठी आणि इतर अनेक मार्गांनी फायदेशीर ठरू शकते, असा दावा एका संशोधनात करण्यात आला आहे. असे म्हटले जाते की नैसर्गिक प्रकाशाकडे पाहणे मानसिक आणि शारीरिक आरोग्यास बळ देते. सकाळच्या सूर्यप्रकाशामुळे तुमची सर्केडियन लय सुसंगत राहण्यास मदत होते, कारण नैसर्गिक प्रकाश शरीराला जागृत करतात. आणि शरीराची अंतर्गत घडी बसविण्यात मदत करतात. ज्यामुळे चांगली झोप येते. शरीरातील सेरोटोनिन हार्मोन सूर्यप्रकाशामुळे उत्तेजित होतो, जे आपल्याला एकाग्र आणि सक्रिय राहण्यास मदत करते.

एका अभ्यासात सकाळचे ऊन बॉडी मास इंडेक्स कमी होण्याशी जोडले गेले आहे. मास इंडेक्स हा एक उपाय आहे जो वजन आणि उंची विचारात घेतो. हे चांगल्या झोपेच्या चक्रासाठीदेखील जबाबदार आहे, जे वजन कमी करण्यासाठी आवश्यक आहे. सूर्यप्रकाश मिळवण्याचा एक उत्तम मार्ग म्हणजे सकाळची कसरत घराबाहेर करणे किंवा वॉक करणे. कॅलरीज बर्न करण्यासह झोपही सुधारते. सूर्यप्रकाश डोळ्यांसाठी खूप महत्त्वाचा आहे. ज्या तरुणांनी दिवसाच्या प्रकाशात काही वेळ घालवला, त्यांना दूरदृष्टीचा धोका कमी झाला.

# शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्या; अन्यथा आंदोलन करू!

## ■ शेतकरी संघर्ष समितीचा नागोठणे रिलायन्स व्यवस्थापनाला इशारा

**पाली : प्रतिनिधी**

रसायनमिश्रित सांडपाणी वाहिनी फुटून शिहू चोळे विभागातील शेतकऱ्यांचे सातत्याने नुकसान होत आहे, या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना विनाविलंब नुकसानभरपाई द्यावी; अन्यथा कार्यालयाबाहेर ठिय्या आंदोलन करू, असा इशारा शेतकरी संघर्ष समिती व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी नागोठणे येथील रिलायन्स कंपनीला शुक्रवारी (दि. २८) निवेदनाद्वारे दिला.

नागोठणे येथील रिलायन्स कंपनीची रसायनमिश्रित सांडपाणी वाहिनीला गळती लागून शिहू चोळे विभागातील शेतकऱ्यांचे सातत्याने नुकसान होत असल्याचा आरोप शेतकरी संघर्ष समिती व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी



(छाया : धम्मशील सावंत)

### सांडपाणी वाहिनीमुळे फटका

केला आहे. त्याबाबत वेळोवेळी तक्रारी अर्ज व नुकसानभरपाईची मागणी करूनदेखील नुकसानभरपाई मिळत नसल्याने बाधीत शेतकऱ्यांनी शुक्रवारी कंपनीच्या इस्टेट ऑफिसला धडक देत रिलायन्स व्यवस्थापनाला आपल्या मागणीचे निवेदन दिले. या वेळी शेतकरी संघर्ष समितीचे अध्यक्ष अनंत भुरे, रमेश घासे, नारायण म्हात्रे, धर्मा घासे, नामदेव घासे, भारती घासे, सुवर्णा घासे, नामदेव म्हात्रे, सखाराम गदमळे, धर्मा म. घासे, दिलीप घासे, सागर पाटील, लहु भुरे, कौसल्या पाटील, पूनम बैकर, हिराबाई भुरे, तृप्ती भोइर, झाकिबाई कुथे, सरस भोईर, पप्पी घासे आदी नुकसान बाधित शेतकरी उपस्थित होते.

> **रिलायन्स कंपनीचे रसायन मिश्रित सांडपाणी सुपीक जमिनीला नापीक करीत असल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत. कंपनीने बाधीत शेतकऱ्यांना योग्य ती नुकसानभरपाई द्यावी, अन्यथा आम्ही सर्व शेतकरी न्याय मिळेपर्यंत ठिय्या आंदोलन करू.**
> **–अनंत भुरे, अध्यक्ष, शेतकरी संघर्ष समिती**

(छाया : भारत चोगले)



## बुडालेली लक्ष्मीविजय नौका काढली बाहेर

### ■ श्रीवर्धन जीवना कोळीवाडा, भरडखोल येथील शेकडो मच्छीमारांच्या प्रयत्नांना यश

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

येथील समुद्रात रविवारी दुपारनंतर बुडालेल्या लक्ष्मी विजय नौकेला बाहेर काढण्यात जीवना कोळीवाडा व भरडखोल येथील मच्छीमारांना यश आले आहे.

श्रीवर्धन जीवना बंदर येथील श्रीकृष्ण सहकारी मत्स्यव्यावसायिक संस्थेच्या अनिकेत लक्ष्मण रघुवीर यांची लक्ष्मीविजय (खछ्ऊ चक ३ चच् ४१९२) नौका सुकाणू तुटल्यामुळे रविवारी दुपारनंतर भरकटली. तिला मुळगाव येथील खांडीमध्ये सुरक्षित ठिकाणी नेत असतांना दगडावर आदळल्याने नौकेला दांडा तरिबंदर टोकाजवळ जलसमाधी मिळाली होती. त्यावेळी नौकेवर असलेले अनिकेत रघुवीर, बाळकृष्ण रघुवीर, जयेश रघुवीर आणि गणेश कुलाबकर या चार खलाशांनी हे मुत्यूशी झुंज देत किनारा गाठला होता. या घटनेत नौकेसह जाळी मिळून एकूण सुमारे १२ ते १५ लाख रुपयांचे नुकसान झाले.

बुडालेली लक्ष्मीविजय नौका बाहेर काढण्यासाठी जीवना कोळीवाडा व भरडखोल येथील पाचशेपेक्षा जास्त मच्छीमार आपल्या छोट्या–मोठ्या नौका घेऊन मदतीला धावले होते. चार ते पाच तास अथक परिश्रम घेऊन त्यांनी नौकेला जीवना बंदरात खेचून आणले. त्यानंतर नौकेला पाण्यातून वर काढण्यासाठी शेकडो महिलांनी सहकार्य केले.

## रायगड किल्ला पर्यटकबंदीमुळे स्थानिक व्यावसायिकांवर संक्रांत

**महाड : प्रतिनिधी**

कोरोनाने पुन्हा डोके वर काढल्याने शासनाने पर्यटन स्थळांवर पर्यटनास बंदी घातली आहे. मात्र समुद्र किनारे आणि इतर ठिकणे सुरु असताना केवळ गड, किल्ले पर्यटकांसाठी बंद ठेवण्यात आले आहेत. त्यामुळे किल्ले रायगडावर पर्यटक येत नसल्याने येथील छोट्याछोट्या विक्रेत्यांवर आणि व्यवसायीकांवर उपासमारीची वेळ आली आहे.

किल्ले रायगड परिसरातील रायगडवाडी, हिरकणीवाडी, नेवाळी, परडीवाडी, टकमकवाडी येथील ग्रामस्थ सरबत, ताक, दही विक्री तसेच हॉटेल व्यवसाय, रायगड मार्गदर्शक असे व्यवसाय करतात. कोरोनामुळे गेली दोन वर्ष किल्ले हे सर्व व्यवसाय ठप्प होते. त्यामुळे स्थानिक व्यवसायिकांना अर्थिक फटका सहन करावा लागला होता. आता पुन्हा किल्ले रायगडावर येण्यास पर्यटकांना बंदी घालण्यात आली आहे. गेल्या दोन महिन्यापासून रायगडावर पर्यटक येणे बंद झाले आहे. याचा परिणाम येथील छोट्या–मोठ्या व्यवसायिकांवर झाल्याचे दिसून येत आहे.

किल्ले रायगड परिसरात सध्या एसटी बसेस जात नाहीत. खाजगी प्रवासी भाडेदेखील वाढले आहे. पर्यटक फिरकत नसल्याने रायगड आणि परिसरात शुकशुकाट दिसून येत आहे.

(छाया : महेश शिंदे)



## पन्नास टक्के उपस्थितीची परवानगी द्यावी

### मंडप डेकोरेटर्स संघटनेतर्फे मुरूड तहसीलदारांना निवेदन

**मुरूड : प्रतिनिधी**

मंडप, कार्यालय, हॉल, लॉन्समधील कार्यक्रमांना पन्नास टक्के उपस्थितीची परवानगी द्यावी, अशा मागणीचे निवेदन मुरूड तालुका मंडप डेकोरेटर्स संघटनेने तहसीलदार रोशन शिंदे यांना दिले.

कोरोनामुळे सामाजिक, वैवाहिक, धार्मिक व राजकीय कार्यक्रमांना स्थगिती देण्यात आली आहे. त्यामुळे टेन्ट, मंडप, कॅटरिंग, बैंक्वेट हॉल, डीजे साउंड, लाईट, डेकोरेशन, इव्हेंट व्यवस्थापन इत्यादि सेवा देणारे लोक प्रभावित होऊन आर्थिक अडचणीत सापडले आहेत.



(छाया : संजय करडे)

दरम्यान, ५० लोकांच्या उपस्थितीत हॉटेल, बॅक्वेट, हॉल, मंडप, फॉर्महाऊस, टेन्ट यात लग्नसमारंभ करण्याची परवानगी आहे. मात्र एवढ्या कमी संख्येत कार्यक्रम करण्यासाठी आयोजक सहमत नाहीत. त्यामुळे कार्यक्रम होत नसल्यामुळे संबंधित व्यवसायिक व त्यांच्यापासून अवलंबून असलेले परिवारांना आर्थिक चिंतेने ग्रासले आहे, असे निवेदनात म्हटले आहे. शासनाने मंडप, कार्यालय, हॉल, लॉन्समधील सर्व प्रकारच्या कार्यक्रमांसाठी ५० टक्के उपस्थितीची परवानगी द्यावी अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे. मुरूड तालुका मंडप डेकोरेटर्स संघटनेचे अध्यक्ष महेंद्र गार्डी यांनी तहसीलदार रोशन शिंदे यांना हे निवेदन दिले. या वळी संघटनेचे उपाध्यक्ष स्वप्निल गुंजाळ व सचिव अनिकेत गुंड यांच्यासह ३० सदस्य उपस्थित होते.

(छाया : अनिस मनियार)



## शिर्कीचाळ येथे शॉर्टसर्किटमुळे घराला आग; लाखोंचे नुकसान

**पेण : पेण**

तालुक्यातील शिर्कीचाळ नंबर २ येथील सागरवाडी येथील यशवंत पाटील यांच्या घरात शॉर्टसर्किटमुळे आग लागली. या आगीत संपूर्ण घर जळून खाक झाले असून सुमारे दोन लाख तीन हजार रुपयांचे नुकसान झाले आहे.

सागरवाडी येथे यशवंत पाटील, सुमन पाटील व भूषण पाटील यांचे सामूहिक मालकीचे घर असून कुटुंबातील सर्व व्यक्ती कार्ला येथील एकविरा देवीच्या दर्शनाला गेले होते. शॉर्टसर्किटमुळे सकाळी ६ वाजण्याच्या दरम्यान घराला आग लागली आणि संपूर्ण घर आगीच्या भक्ष्यस्थानी पडले.

या आगीत घरातील सर्व फर्निचर, संपूर्ण विद्युत फिटिंग, टीव्ही, फ्रिज, पंखा आदी इलेक्ट्रॉनिक वस्तू, सर्व कागदपत्रे व भात, तांदुळ सर्व कडधान्य आदी जीवनावश्यक वस्तू जळून खाक झाल्या.

सदर आगीची बातमी परिसरात वाऱ्यासारखी पसरताच सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक, तलाठी, वडखळ पोलीस आदींनी तात्काळ घटनासथळाला भेट दिली.

पोलीस व महसूल विभागाकडून घटनेचा पंचनामा करण्यात आला. जेएसडब्ल्यू स्टील कंपनीने सीएसआर फंडातून सदर कुटुंबाला मदत करावी, अशी मागणी सागरवाडी ग्रामस्थांनी केली आहे.

## नेरळच्या डिस्कव्हर रिसॉर्टमधील निलंबित कामगारांचे उपोषण स्थगित

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यतील नेरळ धामोते येथील डिस्कव्हर रिसॉर्टच्या व्यवस्थापकाने काही कामगारांना अचानक कामावरून कमी केले होते. आपल्याला न्याय मिळावा, यासाठी निलंबित काही कामगारांनी रिसॉर्टसमोर बेमुदत उपोषण सुरू केले होते. उपोषणच्या तिसऱ्या दिवशी शुक्रवारी (दि. २८) त्या कामगारांना व्यवस्थापनाने पुन्हा कामावर घेतले आहे.

डिस्कव्हर रिसॉर्टमध्ये काम करणाऱ्या १७ कामगारांना व्यवस्थापकाने कोणत्याही प्रकारे पूर्वसूचना न देता १२ जानेवारी रोजी कामावरून काढले होते.

आपल्याला पुन्हा कामावर घ्यावे यासाठी भरत हिरू कराळे, भास्कर दत्तू विरले, धनेश शरद म्हसकर, नरेश खंडू विरले, अनंता दत्तू विरले, धर्मा शिवराम पेरणे या निलंबीत कामगारांनी बुधवारपासून रिसॉर्टच्या गेटसमोर बेमुदत उपोषण सुरु केले होते.

रिसॉर्ट व्यवस्थापनाने शुक्रवारी उपोषणकर्त्या कामगारांची भेट घेऊन चर्चा केली. त्यानंतर त्यांना कामावर घेण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे या कामगारांनी उपोषण मागे घेतले.




## कामगारांना मारहाणप्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**कर्जत : बातमीदार**

नेरळ–कळंब मार्गावरील धामोते गावाच्या हद्दीत असलेल्या डिस्कव्हर हॉटेलमधील कर्मचाऱ्यांना मारहाण आणि शिवीगाळ करण्याची घटना २५ जानेवारी रोजी घडली होती. या प्रकरणी नेरळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नेरळ पोलीस ठाणे हद्दीत दिनांक २५/०१/२०२२ रोजी २२:१५ वा.सुमारास मौजे धामोते येथील डिस्कव्हरी हॉटेलमधील कामगार २५ जानेवारी रोजी रात्री नेरळ रेल्वे स्टेशनपासून चालत जात येत होते. डिस्कव्हरी रिसॉर्टसमोर सात ते आठ अनोळखी इसमांनी हातात लाकडी दांडके घेऊन त्यांचा रस्ता अडविला. तुम्ही रिसॉर्टमध्ये कामाला जायचे नाही असे बोलून त्यांनी कामगारांना हाताबुक्क्यांनी मारहाण करुन शिवीगाळी केली. या प्रकरणी नेरळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास उपनिरीक्षक गिरीश भालचिम करीत आहेत.





### कागदपत्रे हरविलेबाबत

**श्री. प्रविण रंगराव मोरबाळे,** साई प्लाझा, ए–विंग ४०२, एमटीएनएल ऑफीसजवळ, पनवेल, जि. रायगड यांचेकडून पनवेल परिसरात प्रवास करीत असताना खालील कागदपत्र दिनांक २५/०१/२०२२ रोजी सकाळी ११.०० वा. कोठेतरी पडून हरवले आहे. त्याबाबत पनवेल शहर पोलीस स्टेशन येथे दिनांक २६/०१/२०२२ रोजी नोंद केली आहे.

**हरविलेले कागदपत्र : सावळारामजी पद्मारावजी पटेल यांच्या नावे असलेल्या मालमत्ता ओळख खरेदी दस्त क्र. ९९२८/६, पावती क्र. ९९८७, दिनांक २८/१२/२००६.**

सदर कागदपत्र जर कुणाला सापडले असल्यास श्री. प्रविण रंगराव मोरबाळे यांचेकडे आणून द्यावे अथवा ९७६८३९१०१५ या नंबरवर संपर्क साधावा.

दि. २७/०१/२०२२

**सही/–**
**श्री. प्रविण रंगराव मोरबाळे**

साई प्लाझा, ए–विंग ४०२, एमटीएनएल ऑफीसजवळ, पनवेल, जि. रायगड


## म्हसळा नगरपंचायत हद्दीतील तीन गावठणे गायब

**म्हसळा : प्रतिनिधी**

तालुका भूमी अभिलेख खात्याच्या रेकॉर्डप्रमाणे म्हसळा शहरांत चार गावठणे आहेत. मंडळ अधिकारी व तलाठी यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार सात गावठणे असल्याचे लेखे उपलब्ध आहेत. त्यामुळे म्हसळा शहरातील तब्बल तीन गावठणांबाबत महसुली अभिलेख आणि भूमी अभिलेख यामध्ये तफावत आहे. मात्र ही तफावत दूर करण्यासाठी मागील ६५ वर्षात काहीच कार्यवाही किंवा तरतूद झालेली दिसत नाही.

म्हसळा शहरातील गावठण क्र. ५,६ व ७ या तीन गावठणांचे महसुली लेख हे भूमी अभिलेख विभागाकडे पोहचेपर्यंत गहाळ कसे झाले, हा प्रकार प्रचंड गंभीर विषय आहे. म्हसळा गावठण नं १मध्ये ५१७ प्रॉपर्टी, गा.नं २मध्ये १९ प्रॉपर्टी, गा.नं. ३मध्ये ४० प्रॉपर्टी, नं ४ मध्ये २० प्रॉपर्टी असल्याबाबत महसुल व भूमि अभिलेख यांचे एकमत आहे.

गावठण नं ५ (कन्याशाळा, शंकर मंदिर गोडाऊन, हरिजन हौसींग सोसायटी परिसर), गावठण नं ६ (गौळवाडी परिसर), गावठण नं ७ (बौद्धवाडी परिसर) या तीन गावठणाची तालुका व जिल्हा भूमी अभिलेख विभागात मात्र नोंदच नसल्याची धक्कादायक माहिती पुढे येत

वास्तविक पहाता महाराष्ट्र जमीन महसुल लेखे (महसुल आधिकाऱ्यांची कार्यपद्धती) नियम१९६६ आणि त्याखाली केलेल्या नियमांप्रमाणे संबधीत महसुली लेखे सुस्थितीत ठेवणे तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांच्या मुख्य कर्तव्याचा भाग आहे. तरीसुध्दा त्याकडे दुर्लक्ष का होते, हे अद्यापही अनुत्तरीत आहे.

म्हसळा नगरपंचायत हद्दीतील सर्व गावठणे द्रोणच्या सहाय्याने मोजून मिळावीत, अशी मागणी गावठण नं ५ मधील प्रापर्टीधारक (कन्याशाळा शंकर मंदिर गोडाऊन, हरिजन हौसींग सोसायटी परिसर) पालकमंत्र्यांकडे करणार आहेत.

## नेरळ ते उकरूळ पायी पालखी सोहळा

**कर्जत : बातमीदार**

नेरळ येथील मोहाचीवाडी येथे असलेल्या श्री ओमसाई मंदिर देवस्थानतर्फे गुरुवारी (दि. २७) उकरूळ येथील साई मंदिरापर्यंत पायी पालखी काढण्यात आली. श्री ओमसाई मंदिर देवस्थानच्या वतीने दरवर्षी जानेवारी महिन्यातील शेवटच्या गुरुवारी नेरळ मोहाचीवाडी ते उकरूळ येथील श्री साई मंदिर अशी आठ किमी पायी पालखी काढली जाते. मंदिरातून निघालेली पालखी उकरूळ येथील मंदिरात पोहचली.


**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

### E-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender No. EE/400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/ | Description | Estimated cost in lakhs | Submission date |
|---|---|---|---|---|
| 1 | e-Tender-20/21-22/ Rfx No.7000022096 | E- Tender for construction of revetment & protection wall at various location of 400 kV Nagothane-Padghe (D/C) line & 400 kV Nagothane Dabhol 1 ckt in hilly area under 400 kV Line Maint. S/dn Nagothane under 400 KV RS (O & M) Division Nagothane.....**2nd call** | Limited to Rs 22,88,864/- | 04.02.22 up to 23:59 hrs. |

EMD fee 1% of estimated cost & Tender fee Rs. 500/- + GST For further details visit our website **https://srmtender.mahatransco.in/**
**Contact Person :** MITESH GOYAL - Mob No. 9461456635, Email ID : **ee7230@mahatransco.in**
**Note:** All eligible supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**EXECUTIVE ENGINEER**
**400kV R.S. (O&M) Dn. Nagothane**














पनवेल : श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर (सीकेटी) स्वायत्त दर्जाप्राप्त महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आठव्या राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेच्या महाअंतिम फेरीला शुक्रवारी सकाळी आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात मान्यवरांच्या उपस्थितीत शानदार प्रारंभ झाला. मुंबईतील प्रमुख थिएटर्सच्या 'तिडीक' या एकांकिकेच्या प्रयोगाने महाअंतिम फेरीला सुरुवात झाली. त्यानंतर माध्यम कलामंच व इतर संस्थांचे प्रयोग सादर झाले.
























राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा (वर्ष ८ वे)

| क्र. | संस्था | एकांकिका | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|
| 10. | कल्लाकार्स थिएटर - ठाणे | लेखक | २९ जानेवारी | सकाळी ९:०० |
| 11. | कोंकण ज्ञानपीठ - उरण | त्रिशंकू | २९ जानेवारी | सकाळी १०:१५ |
| 12. | मृद्रा - कल्याण | साबण | २९ जानेवारी | दुपारी ११:३० |
| 13. | रंगपंढरी - पुणे | विषाद | २९ जानेवारी | दुपारी १२:४५ |
| 14. | कलासक्त - मुंबई | राकस | २९ जानेवारी | दुपारी २:३० |
| 15. | निर्मिती - कोल्हापूर | मनस्वीनी | २९ जानेवारी | दुपारी ३:४५ |
| 16. | अंभृणी सेवा संस्था - नागपूर | पहाटेचा मृत्यू | २९ जानेवारी | दुपारी ५:०० |
| 17. | Abstract Art - Dombivali | हायब्रीड | २९ जानेवारी | संध्या ६:१५ |
| 18. | रुईया कॉलेज आणि गुलमोहर नाट्य - दादर | प्रसाद | २९ जानेवारी | संध्या ७:३० |

स्थळ : आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह ,पनवेल | वेळ: सकाळी ९:०० ते रात्री ९:००

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com